# शाहू महाराज-डॉ. आंबेडकर यांच्या स्नेहसंबंधास मिळणार उजाळा

## विद्यापीठाचा उपक्रम; संशोधन व ग्रंथनिर्मिती प्रकल्प अंतिम टप्प्यात

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील स्नेहसंबंध संशोधन व ग्रंथनिर्मिती प्रकल्प शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून या महामानवांच्या स्नेहसंबंधास उजाळा मिळणार असून, त्यांच्या वैचारिक भूमिका अधिक स्पष्ट होणार आहेत.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष...

राजर्षी शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांचे ऋणानुबंध वेगवेगळ्या कागदपत्रांच्या आधारे उलगडले जात आहेत. त्यांचे विचार अधिक व्यापक प्रमाणात समाजापुढे आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दोन्ही महामानवांमध्ये तत्कालीन परिस्थितीमध्ये जिव्हाळ्याचे संबंध असल्याने त्याचा राष्ट्रीय राजकारण- **पान ६ वर**

पुढारी

# शाहू महाराज-डॉ. आंबेडकर यांच्या स्नेहसंबंधास मिळणार उजाळा

**(पान १ वरून)** समाजकारण यावर प्रभाव पडल्याचे दिसून येते. देशाच्या इतिहासात या घटनेला महत्त्वाचे स्थान आहे. मात्र, त्यावर आजपर्यंत विश्लेषण झाल्याचे दिसून येत नाही. याची दखल घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्राचे प्रा. अविनाश भाले हे या प्रकल्पावर संशोधन व लेखन करीत आहेत.

राजर्षी शाहू महाराज व डॉ. आंबेडकर या दोन महामानवांचा स्नेहसंबंध हा त्यांच्या दोन ते अडीच वर्षांतील भेटी आणि पत्रव्यवहारापुरता मर्यादित नाही. या सहसंबंधाचा जाती निर्मूलन, सामाजिक न्याय व शिक्षण विषयक भूमिका व कृती यावर झालेला प्रभाव प्रकल्पाच्या माध्यमातून शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे. माणगाव परिषदेबाबतची कागदपत्रे, फोटो, आठवणी आदी संकलन व डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत महिलांचा सहभाग या शीर्षकाचा संशोधन व ग्रंथ निर्मिती प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यास विद्यापीठाने नुकतीच मान्यता दिली आहे.

राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील स्नेहसंबंध संशोधन व ग्रंथ निर्मिती प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे. सामाजिक परिवर्तन कार्याला वैचारिक दिशा देणारा फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचारप्रवाह समाजाला मार्गदर्शक ठरणार आहे.

**- प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन,** संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र

My Kolhapur Edition
14 Apr, 2019 Page No. 6
Powered by : erelego.com

# विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज विशेष व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त रविवारी (दि. १४ ) सकाळी दहा वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात संजय आवटे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आजच्या संदर्भात' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एस. एस. महाजन यांनी केले आहे.

# आलोक जत्राटकर यांना पीएच.डी.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांना वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विषयामध्ये शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली आहे. आलोक जत्राटकर यांनी 'दलितमुक्तीचा प्रश्न : ब्राह्मणेतर आणि दलित वृत्तपत्रांच्या भूमिकेचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावर विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. जत्राटकर वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विषयातील नेट व सेट परीक्षाही उत्तीर्ण आहेत. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. अशोक चौसाळकर आणि डॉ. एन. डी. जत्राटकर यांचे प्रोत्साहन लाभले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समारंभ आयोजित केला आहे. त्यानिमित्त रविवार, दि. १४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन येथे प्रा. गोपाळ गुरू यांचे 'डॉ. आंबेडकर एक आधुनिक कैवारी' विषयावर व्याख्यान होत आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य दिनकर खाबडे आहेत. या समारंभाला उपस्थित राहण्याचे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष, जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले आहे.

# विद्याशाखेच्या स्वीकृत सदस्यपदी अमृत सुतार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेच्या स्वीकृत सदस्यपदी अमृत सुतार यांची निवड करण्यात आली. गेली तब्बल ३५ वर्षे आयकर सल्लागार म्हणून कार्यरत असलेले सुतार मूळचे ऐनापूर (ता. गडहिंग्लज) येथील आहेत. सुतार यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेला नक्कीच होईल, अशी खात्री अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. नवोदित आयकर सल्लागारांना सुतार यांच्या अनुभवाचा निश्चितच लाभ होणार आहे. ते रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कोल्हापूर शाखा सल्लागार मंडळाचे सदस्य आहेत.

सकाळ

# अलोक जत्राटकरांना पीएच.डी.



कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांना वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विषयामध्ये शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली. जत्राटकर यांनी 'दलितमुक्तीचा प्रश्न : ब्राह्मणेत्तर आणि दलित वृत्तपत्रांच्या भूमिकेचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावर विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. श्री. जत्राटकर वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विषयातील नेट, सेट परीक्षाही उत्तीर्ण आहेत. त्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. अशोक चौसाळकर आणि डॉ. एन. डी. जत्राटकर यांचे प्रोत्साहन लाभले.

Kolhapur, Main
14/04/2019 Page No. 7

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 APR 2019
तरूण भारत

# विद्यापीठात आज व्याख्यान

**कोल्हापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार (दि. १४) सकाळी १० वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आजच्या संदर्भात' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी आहेत. तरी जास्तीत जास्त प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी केले आहे.